रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

• वर्ष १९ • अंक १
www.ramprahar.com

• शनिवार, १८ जुलै २०२६ • पाने ८ • किंमत ₹२












सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ५४] शुक्रवार, जुलै १०, २०२६/आषाढ १९, शके १९४८ [पृष्ठे १६, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ८०**
**प्राधिकृत प्रकाशन**

### उपजिल्हाधिकारी भूसंपादन रायगड अलिबाग यांजकडून

### अधिसूचना

### भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक संकिर्ण–एस.आर.क्र. १६३२ ते १६३६/२०२६. – ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ–२, दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड ओ) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता भूमीसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त "सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावीत ;)

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट–कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा);

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनाकांपासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही;

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपजिल्हाधिकारी भूसंपादन रायगड अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे आवारात, ता. अलिबाग, जि. रायगड** यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची–एक**
**जमिनीचे वर्णन**
**गावाचे नाव मौजे भालिवडी, ता. कर्जत, जि. रायगड,**

**अनुसूची–एक**
जमिनीचे वर्णन
गावाचे नाव मौजे भालिवडी, ता. कर्जत, जि. रायगड.

| अ. क्र. | सर्व्हे नं. | संपादनाचे क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|
| १ | ७०/१ | ०.३४.४१ |
| २ | ७०/२ | |
| ३ | ७०/३ | |
| ४ | ७०/४ | |
| ५ | ७०/५/अ | |
| ६ | ७०/५/ब | |
| ७ | ७१/१ | ०.१८.५२ |
| ८ | ७१/२ | |
| ९ | ७१/३/अ | |
| १० | ७१/३/ब | |
| ११ | ७१/३/क | |
| १२ | ७३/१ | ०.२९.२० |
| १३ | ७३/२ | |
| १४ | ७३/३ | |
| १५ | ७३/४ | |
| १६ | ७३/५ | |
| १७ | ७७/१/अ | ०.६१.०१ |
| १८ | ७७/१/ब | |
| १९ | ७७/२ | |
| २० | ७७/३ | |
| २१ | ७७/४ | |
| २२ | ७७/५/अ | |
| २३ | ७७/५/ब | |
| २४ | ७७/५/क | |
| २५ | ८२/१ | ०.०३.७३ |
| २६ | ८२/२ | |
| २७ | ८२/३ | |
| २८ | ८२/४ | |
| २९ | ८२/५ | |
| ३० | ८२/६/१ | |
| ३१ | ८२/६/२ | |
| ३२ | ८२/७ | |
| ३३ | ८२/८ | |
| ३४ | ८३/१/अ | ०.३०.१० |
| ३५ | ८३/१/ब | |
| ३६ | ८३/२ | |
| ३७ | ८३/३ | |
| ३८ | ८३/४ | |
| ३९ | ८४/१ | ०.३०.९७ |
| ४० | ८४/२/अ | |
| ४१ | ८४/२/ब | |
| ४२ | ८४/३ | |
| ४३ | ८४/४ | |
| ४४ | ८४/५ | |
| ४५ | ८५/१ | ०.२२.०८ |
| ४६ | ८५/२ | |
| ४७ | ८५/३ | |
| ४८ | ८५/४ | |
| ४९ | ८५/५ | |
| ५० | ९३/१ | ०.२६.७९ |
| ५१ | ९३/२/अ/१ | |
| ५२ | ९३/२/अ/२ | |
| ५३ | ९३/२/अ/३ | |
| ५४ | ९४/१/अ | ०.३५.९४ |
| ५५ | ९४/१/ब | |
| ५६ | ९४/२ | |
| ५७ | ९५/१ | ०.३६.०१ |
| ५८ | ९५/२ | |
| ५९ | ९५/३ | |
| ६० | ९६/१ | ०.२९.२२ |
| ६१ | ९६/२ | |
| ६२ | ९६/३ | |
| ६३ | ९६/४ | |
| ६४ | ९६/५ | |
| ६५ | ९६/६ | |
| ६६ | ९६/७ | |
| ६७ | ९६/८ | |
| ६८ | ९६/९ | |
| ६९ | ९६/१० | |
| ७० | ९६/११ | |
| ७१ | ९६/१२ | |
| **एकूण** | | **३.५७.९८** |

गावाचे नाव मौजे पोटल, ता. कर्जत, जि. रायगड.

| अ. क्र. | सर्व्हे नं. | संपादनाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| १ | २०/१/अ | ०.२६.७८ |
| २ | २०/१/ब | |
| ३ | २०/३ | |
| ४ | २०/५ | |
| ५ | २०/६ | |
| ६ | २०/७ | |
| ७ | २०/८ | |
| ८ | २०/९ | |
| ९ | २०/१० | |
| १० | २०/११ | |
| ११ | २०/१२ | |
| १२ | ८२/१ | ०.०१.६३ |
| १३ | ८२/२ | |
| १४ | ८२/३/अ | |
| १५ | ८२/३/ब | |
| १६ | ८२/४/अ | |
| १७ | ८२/४/ब | |
| १८ | ८२/६ | |
| १९ | ८२/८ | |
| २० | ८२/९ | |
| २१ | ८२/१० | |
| २२ | ८२/११ | |
| २३ | ८२/१२ | |
| २४ | ८२/१३ | |
| २५ | ८२/१४ | |
| २६ | ८२/१५ | |
| २७ | ८२/१७ | |
| २८ | ८२/१८ | |
| २९ | ८२/१९ | |
| ३० | ८२/२१ | |
| ३१ | ८३/१ | ०.२७.५८ |
| ३२ | ८३/३ | |
| ३३ | ८३/४ | |
| ३४ | ८३/५/अ | |
| ३५ | ८३/५/ब | |
| ३६ | ८३/६/अ | |
| ३७ | ८३/६/ब | |
| ३८ | ८३/७ | |
| ३९ | ८३/९ | |
| ४० | ८४/१ | ०.४०.२० |
| ४१ | ८४/२ | |
| ४२ | ८४/३ | |
| ४३ | ८४/४ | |
| ४४ | ८४/५ | |
| ४५ | ८४/६ | |
| ४६ | ८४/७ | |
| ४७ | ८४/८ | |
| ४८ | ८४/९ | |
| ४९ | ८४/१०/अ | |
| ५० | ८४/१०/ब | |
| ५१ | ८४/११ | |
| ५२ | ८५/१ | ०.८७.९० |
| ५३ | ८५/२/अ | |
| ५४ | ८५/२/ब | |
| ५५ | ८५/३ | |
| ५६ | ८५/४ | |
| ५७ | ८५/६ | |
| ५८ | ८५/१० | |
| ५९ | ८५/११ | |
| ६० | ८९/१ | ०.४०.९७ |
| ६१ | ८९/२/अ/१ | |
| ६२ | ८९/२/अ/२ | |
| ६३ | ८९/२/ब | |
| ६४ | ८९/३ | |
| ६५ | ८९/४ | |

पान ५ वर..

महिला सक्षमीकरणासाठी व्यवसाय मार्गदर्शन/४ | नीट यूजी परीक्षेत सानिध्य डोंगरे मुंबईत अव्वल/७

रायगड, नवी मुंबई
• वर्ष १९ • अंक १
www.ramprahar.com

राम प्रहर

• शनिवार, १८ जुलै २०२६ • पाने ८ • किंमत ₹२

# पनवेल मनपाचे नागरी सुविधांना प्राधान्य

## खांदेश्वर तलाव परिसरात प्रसाधनगृहांचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नागरिकांना चांगल्या आणि अत्याधुनिक नागरी सुविधा पुरवण्याच्या दृष्टीने पनवेल महानगरपालिकेने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. खांदा कॉलनी सेक्टर २मधील प्रसिद्ध खांदेश्वर तलाव परिसरात महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या दोन अत्याधुनिक आकांशी शौचालयांचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर आणि महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.१७) झाले.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत उभारण्यात आलेली ही आकांशी शौचालये केवळ सामान्य प्रसाधनगृहे नसून ती आधुनिक सोयीसुविधांनी सज्ज आहेत. खांदेश्वर तलाव परिसरात फिरण्यासाठी येणारे नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींची गैरसोय टाळण्यासाठी या शौचालयांची रचना करण्यात आली आहे. दरम्यान, यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी तलावाची पाहणी केली.

या कार्यक्रमास पनवेल महापालिकेचे स्थायी समिती सभापती बबन मुकादम, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, नगरसेवक एकनाथ गायकवाड, दशरथ म्हात्रे, नगरसेविका सीताताई पाटील, कुसुम पाटील, आयुक्त मंगेश चितळे, भाजप नेते गणेश पाटील, मोतीराम कोळी, गोपीनाथ मुंडे, रूपेश नागवेकर यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते. या सुविधेमुळे खांदा कॉलनी आणि परिसरातून खांदेश्वर तलावावर येणाऱ्या नागरिकांना आणि विशेषतः महिलांना मोठा दिलासा मिळाला असून परिसराच्या स्वच्छतेचा दर्जा राखण्यास मदत होणार आहे.



पनवेल : येथील महापालिका क्षेत्रात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विकासकामे जोमाने सुरू आहेत. नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी तसेच परिसराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी कटिबद्ध आहेत. याच विकासकामांचा एक भाग म्हणून किरवली गावातील तलावाच्या सुशोभीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामाची पाहणी महापौर नितीन पाटील आणि माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी शुक्रवारी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून कामाचा आढावा घेत चर्चा केली. या पाहणी दौऱ्यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, नगरसेवक दिनेश खानावकर, सुमित झुंजारराव, नगरसेविका लीना म्हात्रे, यशश्री पाटील, संतोष पाटील, नंदकुमार म्हात्रे, रूपेश नागवेकर यांच्यासह स्थानिक उपस्थित होते.

### देशातील पहिली हायड्रोजन ट्रेन सुरू

**जिंद (हरियाणा) : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (दि.१७) हरियाणातील जिंद येथे भारतातील पहिल्या हायड्रोजन-चालित ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला. जिंद ते सोनीपतदरम्यान धावणारी ही ट्रेन स्वदेशी तंत्रज्ञानावर विकसित केली आहे. या ट्रेनमुळे भारत हायड्रोजन रेल्वे तंत्रज्ञानात जगातील अग्रेसर देशांमध्ये दाखल झाला आहे.

१० कोच असलेली ही ट्रेन पूर्णपणे भारतात डिझाइन, इंजिनिअर आणि इंटिग्रेट करण्यात आली आहे.










## संपादकीय

# राजकीय हेतूने प्रेरित

‘नीट’ परीक्षेबाबत निर्माण झालेल्या वादानंतर केंद्र सरकारने तातडीने त्यासंदर्भात कसून चौकशी सुरू केली व दोषींवर कारवाईची प्रक्रियाही वेगाने राबवली. त्याखेरीज सरकारने या परीक्षेच्या व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी निरनिराळी पावलेही उचलली. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्न संवेदनशीलतेने हाताळावे लागतात व या प्रश्नांवरील उपाय आंदोलने किंवा राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा संस्थात्मक सुधारणांतूनच सापडतात.

**‘नीट’ परीक्षेतील पेपरफुटीविरोधात सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी गेले काही दिवस दिल्लीतील जंतरमंतर येथे कथित आमरण उपोषण पुकारले आहे. कॉकरोच जनता पार्टी नावाच्या सोशल मीडियावरील एका आभासी पक्षाने ‘नीट’ पेपरफुटीविरोधात आंदोलन करण्याचा प्रयत्न केला, त्याचाच हे उपोषण एक भाग आहे. वांगचुक यांनी गेल्या वर्षी केंद्रशासित लडाखला राज्यघटनेच्या सहाव्या अनुसूचीत समावेश करुन राज्याचा दर्जा मिळावा म्हणून असेच आंदोलन केले होते. या आंदोलनातील हिंसाचारात काही जणांना प्राणही गमवावे लागले. त्यामुळे वांगचुक काही काळ अटकेतही होते. आता पेपरफुटीबद्दल केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा ही त्यांच्या आंदोलनाची प्रमुख मागणी आहे. वांगचुक यांच्या या आंदोलनांमागे त्यांची राजकीय महत्त्वाकांक्षा असल्याचेही बोलले जाते. त्यामुळेच की काय, वांगचुक उपोषणाला बसल्यापासून बराच काळ विरोधीपक्षातील एकही बडा नेता तेथे उगवला नव्हता. मोदी सरकारविरोधात कायम गरळ ओकणाऱ्या काही कथित सेलिब्रिटींनी तेवढी तेथे हजेरी लावली. परंतु आता संसदेच्या अधिवेशनाच्या तोंडावर मात्र हळुहळू विरोधीपक्षांचे नेते तेथे हजेरी लावत असून यातून आपल्याला आपली राजकीय पोळी कशी आणि किती भाजून घेता येईल याचा अंदाज घेताना दिसत आहेत. वांगचुक यांनी केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत उपोषण सुरू ठेवले असले, तरी केवळ राजीनामा हा प्रत्येक समस्येचा अंतिम उपाय ठरत नाही. कोणत्याही व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी दीर्घकालीन धोरणात्मक बदल, मजबूत यंत्रणा आणि कठोर अंमलबजावणी आवश्यक असते. या परीक्षेसंदर्भात बोलायचे तर दोषींवर कारवाई आणि प्रणाली अधिक सक्षम करणे हेच खरे तर विद्यार्थ्यांच्या हिताचे ठरेल. यावर्षी पुनर्परीक्षेची प्रक्रिया अधिक कडक सुरक्षा व्यवस्था, बहुस्तरीय देखरेख आणि विविध केंद्रीय व राज्य यंत्रणांच्या समन्वयातून पार पडली हेही यासंदर्भात लक्षात घेण्याची गरज आहे. परंतु विरोधी पक्षांकरिता मात्र हे आंदोलन म्हणजे संसदेच्या अधिवेशनापूर्वी केंद्र सरकारला घेरण्याची आयती संधी आहे. त्यामुळे वीसएक दिवस उलटून गेल्यावर आता काँग्रेस, आम आदमी पक्षासह अन्य काही विरोधी नेत्यांनी या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला आहे. केंद्र सरकारचा भर दोषींना शिक्षा, चौकशी पूर्ण करणे आणि परीक्षा व्यवस्थेतील विश्वासार्हता पुनर्स्थापित करण्यावर आहे. संसदेच्या अधिवेशनात विरोधकांनी हा मुद्दा उपस्थित करणे स्वाभाविक असले, तरी चर्चेचा भर केवळ राजीनाम्याच्या मागणीवर न राहता भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक सुधारणांवर असायला हवा. या प्रश्नाचे अतिराजकारण झाल्यास विद्यार्थ्यांच्या मूळ समस्यांकडे दुर्लक्षच होण्याचा धोका आहे. लोकशाहीत आंदोलने होतच असतात. परंतु अंतिम तोडगा संवाद, कायदेशीर प्रक्रिया आणि संसदीय चर्चेतूनच निघतो. विद्यार्थ्यांचा विश्वास जिंकण्यासाठी सरकारने सुधारणा अधिक प्रभावीपणे राबवाव्यात तर विरोधकांनीही केवळ राजकीय लाभ न पाहता विधायक सूचना मांडाव्यात. देशातील शिक्षणव्यवस्थेची विश्वासार्हता ही कोणत्याही एका पक्षाची नव्हे तर संपूर्ण राष्ट्राची जबाबदारी आहे.**




# ‘रामप्रहर’चे दीड तप...

आज १८ जुलै २०२६. बरोबर १८ वर्षांपूर्वी दैनिक रामप्रहरचा पहिला अंक आजच वाचकांच्या हातात गेला होता. ढेंगेवर असलेल्या मुंबई शहरातून जाडजूड पानांची नामांकित वृत्तपत्रे पनवेल शहरात येत असताना १८ वर्षे येथून ‘रामप्रहर’ सातत्याने प्रकाशित होत आहे आणि वाचक त्याचा स्वीकार करीत आहेत. आजच्या वृत्तपत्रसृष्टीत हे चित्र सोपे नाही.

‘रामप्रहर’ १८ वर्षे पूर्ण करतोय म्हणजे ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावर आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दैनिक काढण्याचे धाडस दाखवले. ज्या काळात सिंघानियासारख्या उद्योगपतीला ‘इंडियन पोस्ट’ हे नामवंत दैनिक बंद करावे लागले; त्याच्या अनेक वर्षांपूर्वी काँग्रेस पक्षाने सुरू केलेले ‘विशाल सह्याद्री’ याचेही प्रकाशन बंद झाले होते. रामशेठ यांची इच्छाशक्ती एवढी जबर आहे की त्यांच्या दूरदृष्टीचाही या दैनिकामुळे प्रत्यय आला.

‘रामप्रहर’च्या जन्माची कथा मोठी रंजक आहे. रामशेठ यांनी एखादी गोष्ट मनावर घेतल्यावर तडीस जाणारच! आठ दिवसांत वृत्तपत्राचे कार्यालय तयार झाले. रामशेठना वृत्तपत्र चालवण्याचा कसलाही अनुभव नव्हता, पण दूरदृष्टी, व्यवहार आणि प्रत्येक व्यवसायातील खाचाखोचा याचा बारीक अभ्यास त्यांचा असलाच पाहिजे.

केवळ इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी दैनिक वृत्तपत्र सुरू करायचे ठरवले. नाव काय द्यायचे? आणि एका क्षणात ‘रामप्रहर’ हे नाव सुचले. ग्रामीण भागात सकाळ ही उजाडत असताना ‘रामप्रहर’ म्हणत असतात. अजूनही खेडोपाड्यात लोक रामपाऱ्यात भेटलास, रामप्रहरी भेटलास असे म्हणतात. ‘रामप्रहर’ शब्द वाचकांच्या परिचयाचाच होता. मग कधी काढायचे वृत्तपत्र? गुरूपौर्णिमा होती १८ जुलै २००८ला. कर्मवीरांच्या फोटोकडे बघत रामशेठ म्हणाले, गुरूपौर्णिमेलाच सुरू करू. अक्षरशः १५ दिवसांत दिल्लीच्या प्रेस ब्युरो ऑफ इंडियाकडून ‘रामप्रहर’ला मान्यतासुद्धा मिळाली.

पहिल्या अंकाचे प्रकाशन कुणाच्या हस्ते करायचे? अर्थातच तेव्हाचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते. रामशेठ आणि प्रशांत ठाकूर हे विलासरावांना आमंत्रण द्यायला गेले. विलासराव म्हणाले, अहो! विधानसभा सुरू आहे, कसे जमेल? रामशेठ म्हणाले, कसं जमतंय बघा. रामशेठचा आग्रह मोडवेना आणि वेळेचा मेळ जमेना. मग विलासरावच म्हणाले, एक तासात करता का कार्यक्रम. विधानसभा प्रश्नोत्तराचा तास संपला की, लक्षवेधीच्या वेळेत एक तासात समारंभ व्हायला पाहिजे. रामशेठ म्हणाले मंजूर, पण समारंभ करायचा कुठे? विलासरावांनी लगेच सुचवले मुंबई विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात. विद्यापीठाच्या दीडशे वर्षांच्या परंपरेत या देखण्या सभागृहात कोणत्याही वृत्तपत्राचे प्रकाशन झाले नव्हते, पण रामशेठचा हातगुण-पायगुण आणि विलासरावांची इच्छाशक्ती. लगेच विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय खोले यांना विलासरावांनी फोन लावला. ते तिकडून काय बोलतात हे त्यांनी ऐकून दाखवले... तुमचा आदेश सगळी व्यवस्था करतो.

आणि पनवेलसारख्या तालुक्याच्या ठिकाणाहून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिकाचे प्रकाशन मुंबई विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात पहिल्याप्रथम मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. फक्त विलासरावांनी यायचे ठरले होते, पण अर्धे मंत्रिमंडळ हजर झाले. पंधरा-वीस आमदारदेखील आले. प्रश्नोत्तराच्या तासानंतर सभागृहात बाके खाली होती आणि दीक्षांत सभागृह तुडूंब भरले होते. असा हा ‘रामप्रहर’चा प्रवास.

गेली १८ वर्षे ‘रामप्रहर’ रोजच्या रोज वाचकांच्या हातात येतोय. रामशेठना वृत्तपत्रातील बारकावे किती समजतात याचा अनुभव मला घेता आला. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते वृत्तपत्राचे स्वतः मालक असताना त्यांच्यातील ‘मालक’ कधीही जाणवला नाही. संपादकांना त्यांनी पूर्ण अधिकार दिले होते. धोरण ठरवून दिल्यानंतर संपादकांच्या कामात त्यांनी कधीही ढवळाढवळ केली नाही. विरोधकांवर कधीही अवास्तव किंवा व्यक्तिगत टीका त्यांनी आपल्या वृत्तपत्रातून होऊ दिली नाही. १८ वर्षांत ‘रामप्रहर’चा वापर त्यांनी अतिशय सुसंस्कृतपणे आणि प्रतिष्ठेने केला. म्हणूनच आज ‘रामप्रहर’ वाचक १८ वर्षे हातात घेत आहेत.

‘रामप्रहर’ हे वृत्तपत्र हातात असले तरी रामशेठने त्या वृत्तपत्रातून कुणावर अवास्तव टीका होऊ दिली नाही, अपशब्द वापरला नाही. १८ वर्षे वृत्तपत्र चालवणे सोपी गोष्ट नाही. दिल्लीमधील क्रमांक एकवर असलेल्या ‘हिंदुस्तान टाइम्स’सारख्या ख्यातनाम वृत्तपत्राला मुंबईत सातत्य टिकवता आले नाही. ही तुलना नव्हे! रामशेठ यांनी आपले जग मर्यादित ठेवले असले तरी त्या मर्यादित विषयामध्ये त्यांचा हात धरणारा आजपर्यंत कुणी झालेला दिसत नाही. मग ते राजकारण असो, समाजकारण असो, व्यवसाय किंवा वृत्तपत्र असो! शून्यातून विश्व निर्माण करण्याचे नावसुद्धा रामशेठच असले पाहिजे.

रामशेठ विविध क्षेत्रांत वावरत असताना ‘रामप्रहर’वर त्यांचे बारीक लक्ष असते आणि त्यामुळेच रामशेठच्या नावाशी जोडला गेलेला ‘रामप्रहर’ हा रामप्रहरी वाचायला वाचक प्रतिसाद देतात, कारण हे वृत्तपत्र रामशेठ यांचे आहे हे त्यांना माहीत आहे. दर्जा, संयम आणि मर्यादा याचे पुरेपूर भान ठेवून हे वृत्तपत्र यशस्वी झाले आहे. त्या-त्या वेळचे संपादक आणि ‘रामप्रहर’ची गेल्या १८ वर्षांतील संपादकीय टीम, व्यवस्थापन, जाहिरात, वितरण विभाग या सर्वांनी ‘रामप्रहर’ला आपले समजून आत्मियतेने काम केले आहे. म्हणून ‘रामप्रहर’ हा एक परिवारच झाला आहे.

माझ्या वृत्तपत्राच्या ६५ वर्षांच्या अनुभवात ‘मराठा’ असो, ‘लोकमत’ असो, ‘एकमत’ असो, ‘रामप्रहर’ असो, ‘प्रहार’ असो सर्वच ठिकाणी काम करताना एक झिंग होती. ‘रामप्रहर’च्या संपादकीय विभागापासून दूर होऊन मलाही आता १५ वर्षे झाली, तरी ‘रामप्रहर’ मला आपलाच वाटतो आणि रामशेठ त्याहून अधिक जवळचे वाटतात. काही नाती का निर्माण होतात, कशी निर्माण होतात आणि कसा जीव लावतात याचे तर्कशास्त्रात उत्तर मिळत नसते. रामशेठ आणि ‘रामप्रहर’ यांच्याबाबत माझी तीच भावना आहे.

**-मधुकर भावे, ज्येष्ठ संपादक**

# पनवेल महानगरपालिकेतर्फे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी व्यवसाय मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (डेएनयूएलएम) अंतर्गत महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी व्यवसाय मार्गदर्शनपर बैठकीचे आयोजन आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले होते. महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस बचत गटांतील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.



यावेळी मार्गदर्शन करताना ममता म्हात्रे यांनी महिला व बालकल्याण समितीमार्फत सुरू असलेल्या तसेच प्रस्तावित विविध योजनांची माहिती दिली. महिलांना विविध प्रकारचे कौशल्यविकास प्रशिक्षण उपलब्ध करून देणे, त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी बहुउद्देशीय केंद्र सुरू करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच महिलांशी संवाद साधून त्यांच्या अपेक्षा व मागण्या जाणून घेत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

बैठकीत पनवेल महापालिका क्षेत्रातील बचत गटांच्या महिलांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे तसेच उपजीविकेची शाश्वत साधने निर्माण करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. यावेळी महिलांना स्वयंरोजगार, लघुउद्योग, बचत गटांच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती, उद्योग उभारणी तसेच शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती डेएनयुएलएम व्यवस्थापक विनया म्हात्रे यांनी आपल्या प्रास्ताविकात दिली.

> **महिलांनी पारंपरिक व्यवसायाबरोबरच आधुनिक बाजारपेठेचा अभ्यास करून व्यवसायाची निवड करावी. तसेच खाद्यपदार्थ तयार करताना स्वच्छतेचे काटेकोर पालन करणे अत्यंत आवश्यक आहे.**
>
> **-ममता म्हात्रे, सभापती, महिला व बालकल्याण समिती, पनवेल महानगरपालिका**

# स्व. चांगू काना ठाकूर यांचा पुण्यस्मरण सोहळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवाजीनगर येथील श्री स. स. बाळकृष्ण महाराज आध्यात्मिक ज्ञानमंदिर येथे स्व. चांगू काना ठाकूर यांच्या २३व्या पुण्यस्मरण सोहळ्याचे भक्तिमय वातावरणात अत्यंत उत्साहात आयोजन करण्यात आले होते. या पुण्यतिथी सोहळ्याचे औचित्य साधून शिवाजीनगर परिसरामध्ये विविध धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

दोन दिवस चाललेल्या या धार्मिक कार्यक्रमांची सांगता शुक्रवारी माऊलींवर भक्तिभावाने पुष्पवृष्टी करून करण्यात आली. या मंगलमयी सोहळ्याप्रसंगी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, शकुंतला ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, वर्षा ठाकूर यांनी उपस्थितीत राहून दर्शन घेतले. या संपूर्ण धार्मिक सोहळ्याचे मुख्य संयोजक लोकनेते रामशेठ ठाकूर आणि ठाकूर परिवार, तसेच शिवाजीनगर ग्रामस्थ मंडळ होते.

या सोहळ्यादरम्यान ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे, वाय.टी. देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, विश्वनाथ कोळी, जितेंद्र म्हात्रे, वसंत पाटील, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्य रत्नप्रभा घरत, नगरसेविका दर्शना भोईर, प्रतिभा भोईर यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर, ग्रामस्थ, भाविक आणि ठाकूर कुटुंबीय उपस्थित होते.

सोहळा सुनियोजितपणे पार पाडण्यासाठी देवसागर साधक समाज शिवाजीनगर, गव्हाण, न्हावे, न्हावाखाडी आणि कोपर यांनी व्यवस्थापन पाहिले.

# फसवणूक केलेल्या वृद्धाची रक्कम परत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सरस्वती कॉम्प्लेक्स रिस येथील विजय महादेव कांबळे (वय ७३, सेवानिवृत्त) हे २०११ साली आरोग्य खात्यातुन कंपाउंडर या पदावरुन निवृत्त झाले. त्यांचे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मोहोपाडा शाखेत अकाउंट असून होते त्यात त्यांची आयुष्य भराची सेवींग होती.

त्यांना फोनवर अनोळखी व्यक्तीचा फोन आला व त्याने सांगितले कि तमच्या जुने बँक खात्यावर करोडो रुपये जमा आहेत त्यामुळे तुम्हाला अटक करण्यात येईल त्यानतर त्यांने व्हीडीओ कॉल केला तेव्हा समोर एक पोलीस गणवेशात इसम होता विजय कांबळे यांना हे खर वाटल्याने त्यांनी ते जे सांगत होते त्या प्रमाणे` करत गेले व त्यांच्या सांगण्या प्रमाणे IDBI मधिल खात्यवर पैसे पाठविले. नंतर त्यांना फसवणुक झाल्याचे लक्षात आल्याने त्यांनी बँक मॅनेजर यांना सागितले मॅनेजरने त्यांना सायबर तक्रार करण्यास सांगितले.सदर तकारीचे अनुशंगाने रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ व पोलीस हवालदार संतोष म्हात्रे यांनी त्वरीत मदत करुन रक्कम होल्ड करण्यात आली व रिफंडची प्रकिया कोर्टाकडुन केल्यावर संपुर्ण रक्कम त्यांना परत मिळाली. याबद्दल कांबळे यांनी रसायनी पोलिसांचे आभार मानले.

# प्रकाश देसाईंची सहअध्यक्षपदी निवड

**पाली : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि विकासकामांसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे सामाजिक कार्यकर्ते प्रकाश देसाई यांची महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना' अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या १९१-पेण विधानसभा क्षेत्र स्तरीय समितीच्या सह-अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महसूल व वन विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे.



महाराष्ट्र शासनाने शेत आणि पाणंद रस्त्यांच्या विकासकामांमध्ये अधिक पारदर्शकता, गती आणि सुसूत्रता आणण्यासाठी विधानसभा क्षेत्र स्तरीय समित्यांची पुनर्रचना केली आहे. या समित्यांच्या कामकाजाला अधिक बळकटी देण्यासाठी सह-अध्यक्षांची नियुक्ती करण्यात येत असून, महसूलमंत्र्यांच्या अधिकारातून ही निवड करण्यात आली आहे. त्यानुसार पेण-सुधागड-रोहा विधानसभा क्षेत्रासाठी प्रकाश देसाई यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांसाठी पाणंद रस्ते अत्यंत आवश्यक आहेत. शेतमालाची वाहतूक, शेतीसाठी लागणाऱ्या साहित्याची ने-आण तसेच आपत्कालीन परिस्थितीत गावांशी संपर्क राखण्यासाठी या रस्त्यांची भूमिका महत्त्वाची असते. या क्षेत्रातील अनेक प्रलंबित प्रश्न सोडवून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे प्रकाश देसाई यांनी सांगितले.

या निवडीबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रकाश देसाई यांचे अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# वादळी पावसाने अंबा नदीकाठच्या शेतकऱ्याचे नुकसान; गायीचा मृत्यू

**पाली : प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे पाली आणि परिसराला मोठा फटका बसला आहे. या नैसर्गिक आपत्तीत पाली येथील अंबा नदीशेजारी शेती करणारे शेतकरी तुषार ठोंबरे यांच्या शेतातील सौर पॅनेल निकामी झाला, तर गोठा कोसळून गायीचा मृत्यू झाला आहे. त्यांचे लाखोंचे नुकसान झाले असून मोठे संकट कोसळले आहे.



अंबा नदीच्या पाणीपातळीत प्रचंड वाढ झाल्याने नदीकाठच्या शेतात मोठ्या प्रमाणावर पाणी साठले आहे. सद्यस्थितीलाही ठोंबरे यांच्या शेताला तलावाचे स्वरूप आले आहे. पुराच्या पाण्याच्या तीव्र प्रवाहामुळे शेतात बसवलेला सोलर पॅनेल पूर्णपणे पाण्याखाली बुडाला. पाण्यामुळे हा महागडा सौर पॅनेल आता पूर्णपणे नादुरुस्त आणि निकामी झाला आहे. या मुसळधार पावसाचा फटका केवळ पिकाला किंवा उपकरणांनाच बसला नाही, तर त्यांच्या गोठ्यावरही कोसळला. अतिवृष्टीमुळे पाण्याचा जोर वाढल्याने त्यांचा गुरांचा गोठा जमीनदोस्त झाला. गोठा कोसळल्याने दुर्दैवाने गोठ्यात बांधलेली एक गाय मरण पावली आहे.

सौर पॅनेलचे नुकसान, गोठ्याची पडझड आणि पाळीव जनावराचा मृत्यू यामुळे तुषार ठोंबरे यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. एका बाजूला पिकांचे नुकसान आणि दुसऱ्या बाजूला उदरनिर्वाहाचे साधन हिरावले गेल्याने शेतकरी पूर्णपणे खचला आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन शासनाने तातडीने पंचनामा करावा आणि तात्काळ योग्य ती आर्थिक नुकसान भरपाई द्यावी, अशी आर्त मागणी शेतकरी तुषार ठोंबरे यांनी केली आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

पान २ वरुन

| अ. क्र. | सर्व्हे नं. | संपादनाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| ६६ | ८९/५ | |
| ६७ | ८९/६/अ | |
| ६८ | ८९/६/ब | |
| ६९ | ८९/६/क/१ | |
| ७० | ८९/६/क/२ | |
| ७१ | ८९/८ | |
| ७२ | ८९/९ | |
| ७३ | ८९/१० | |
| ७४ | ८९/११ | |
| ७५ | ८९/१२ | |
| ७६ | ९१/१/अ/१ | ०.३५.८४ |
| ७७ | ९१/१/अ/२ | |
| ७८ | ९१/१/ब | |
| ७९ | ९१/१/क | |
| ८० | ९१/२ | |
| ८१ | ९१/४ | |
| ८२ | ९१/५ | |
| ८३ | ९१/६ | |
| ८४ | ९२/१/अ | ०.४६.३१ |
| ८५ | ९२/१/ब/१ | |
| ८६ | ९२/१/ब/२ | |
| ८७ | ९२/१/ब/३ | |
| ८८ | ९२/१/१/क | |
| ८९ | ९२/१/क/२ | |
| ९० | ९२/१/क/३ | |
| ९१ | ९२/१/क/४ | |
| ९२ | ९२/२ | |
| ९३ | ९२/३ | |
| ९४ | ९७/१ | ०.२८.९८ |
| ९५ | ९७/२ | |
| ९६ | ९७/३ | |
| ९७ | ९७/४ | |
| ९८ | ९७/५ | |
| ९९ | ९७/६ | |
| एकूण | | ३.३६.१९ |

गावाचे नाव मौजे आंबोट, ता. कर्जत, जि. रायगड.

| अ. क्र. | सर्व्हे नं. | संपादनाचे क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|
| १ | १/१/अ | ०.४४.१८ |
| २ | १/१/ब | |
| ३ | १/१/ड | |
| ४ | १/१/क | |
| ५ | १/२ | |
| ६ | १/३ | |
| ७ | २०/१/अ | ०.१०.४८ |
| ८ | २०/१/ड | |
| ९ | २०/१/ई | |
| १० | २०/१/फ | |
| ११ | २०/१/ह | |
| १२ | २०/१/क/१ | |
| १३ | २०/१/क/२ | |
| १४ | २०/१/य | |
| १५ | २०/२ | |
| १६ | २०/३ | |
| १७ | २१/१/अ | ०.६०.३९ |
| १८ | २१/१/क/१ | |
| १९ | २१/२ | |
| २० | २१/३ | |
| २१ | २२/१ | ०.६९.४५ |
| २२ | २२/२/अ | |
| २३ | २२/२/ब | |
| २४ | २२/२/क | |
| २५ | २२/३ | |
| २६ | २२/४ | |
| २७ | २२/५/अ/१ | |
| २८ | २२/७ | |
| २९ | २२/९ | |
| ३० | २५/१/अ/१ | ०.२२.९३ |
| ३१ | २५/१/ब | |
| ३२ | २५/१/ड | |
| ३३ | २५/१/ई | |
| ३४ | २५/१/फ | |
| ३५ | २५/१/क/१ | |
| ३६ | २५/२ | |
| ३७ | २५/३ | |
| ३८ | २७/१ | ०.६९.४५ |
| ३९ | २७/२ | |
| ४० | २७/३ | |
| ४१ | २७/४ | |

| अ. क्र. | सर्व्हे नं. | संपादनाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| ४२ | ३१/१/अ/१ | ०.७२.८९ |
| ४३ | ३१/१/ब/१ | |
| ४४ | ३१/१/ड/१ | |
| ४५ | ३१/१/क/१ | |
| ४६ | ३१/२ | |
| एकूण | | ३.४९.७७ |

गावाचे नाव मौजे सायडोंगर, ता. कर्जत, जि. रायगड.

| अ. क्र. | सर्व्हे नं. | संपादनाचे क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|
| १ | ३०/१ | १.३२.७१ |
| २ | ३०/२ | |
| ३ | ३०/३ | |
| ४ | ३०/४/अ/१/अ | |
| ५ | ३०/४/अ/१/ब | |
| ६ | ३०/४/अ/१/२ | |
| ७ | ३०/४/ब | |
| ८ | ३०/५ | |
| ९ | ३०/६/अ | |
| १० | ३०/६/ब | |
| ११ | ३०/६/क | |
| १२ | ३०/७ | |
| १३ | ३०/८ | |
| १४ | ३०/९/अ/१ | |
| १५ | ३०/९/अ/२ | |
| १६ | ३०/९/ब | |
| १७ | ३०/१० | |
| १८ | ३०/११ | |
| १९ | ३०/१२/अ | |
| २० | ३०/१२/ब | |
| २१ | ३०/१३ | |
| २२ | ३०/१४ | |
| २३ | ३०/१५ | |
| २४ | ३०/१६ | |
| २५ | ३०/१७/अ | |
| २६ | ३०/१७/ब | |
| २७ | ३०/१८ | |
| २८ | ३०/१९ | |
| २९ | ३०/२० | |
| एकूण | | १.३२.७१ |

गावाचे नाव मौजे पाली तर्फे कोतल खलाटी, ता. कर्जत, जि. रायगड.

| अ. क्र. | सर्व्हे नं. | संपादनाचे क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|
| १ | १६/१ | ०.६३.०१ |
| २ | १६/२ | |
| ३ | १६/३ | |
| ४ | १६/४ | |
| ५ | १६/५ | |
| ६ | १६/६ | |
| ७ | १६/७ | |
| ८ | १६/८ | |
| ९ | १६/९ | |
| १० | १६/१० | |
| ११ | १६/११ | |
| १२ | १६/१२ | |
| १३ | १६/१३ | |
| १४ | १६/१४/अ | |
| १५ | १६/१४/ब | |
| १६ | १६/१५ | |
| १७ | १६/१६ | |
| १८ | १६/१७/अ | |
| १९ | १६/१७/ब | |
| २० | १६/१८ | |
| २१ | १६/१९ | |
| २२ | ३२/१ | |
| २३ | ३२/१/अ | |
| २४ | ३२/१/ब | |
| २५ | ३२/२ | |
| २६ | ३२/३ | |
| २७ | ३२/५ | |
| २८ | ३२/६ | |
| २९ | १९/१ | ०.३७.८९ |
| ३० | १९/२/अ | |
| ३१ | १९/२/ब | |
| ३२ | १९/३/अ | |
| ३३ | १९/३/ब | |
| ३४ | १९/४ | |
| ३५ | १९/५/अ | |
| ३६ | १९/५/ब | |

| अ. क्र. | सर्व्हे नं. | संपादनाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| ३७ | १९/६ | |
| ३८ | १९/७/अ | |
| ३९ | १९/७/ब | |
| ४० | १९/८/अ | |
| ४१ | १९/८/ब | |
| ४२ | १९/९/अ | |
| ४३ | १९/९/ब | |
| ४४ | १९/१० | |
| ४५ | २०/१ | ०.००.९७ |
| ४६ | २०/२ | |
| ४७ | २०/३ | |
| ४८ | २०/४ | |
| ४९ | २०/५ | |
| ५० | २२/१ | ०.३९.६० |
| ५१ | २२/२/अ | |
| ५२ | २२/२/क | |
| ५३ | २२/२/ब | |
| ५४ | २२/३ | |
| ५५ | २२/४ | |
| ५६ | २२/५ | |
| ५७ | २२/६ | |
| ५८ | २२/७ | |
| ५९ | २२/८ | |
| ६० | २२/९ | |
| ६१ | २२/१० | |
| ६२ | २२/११ | |
| ६३ | २९/१ | ०.७६.२२ |
| ६४ | २९/२ | |
| ६५ | २९/३ | |
| ६६ | २९/४/अ/१ | |
| ६७ | २९/४/अ/२ | |
| ६८ | २९/४/क | |
| ६९ | २९/४/ब | |
| ७० | २९/५/अ | |
| ७१ | २९/५/ब | |
| ७२ | २९/६ | |
| ७३ | ३३/१ | ०.३८.४८ |
| ७४ | ३३/२ | |
| ७५ | ३५/१/अ | ०.३९.१८ |
| ७६ | ३५/१/क/१ | |
| ७७ | ३५/१/क/२ | |
| ७८ | ३५/१/ब | |
| ७९ | ३५/२ | |
| ८० | ३५/३ | |
| ८१ | ३५/४/अ | |
| ८२ | ३५/४/ब | |
| ८३ | ३६/१/अ | ०.३५.३६ |
| ८४ | ३६/१/ब | |
| ८५ | ३६/२ | |
| ८६ | ३६/३/अ | |
| ८७ | ३६/३/ब | |
| ८८ | ३६/४ | |
| ८९ | ३६/५ | |
| ९० | ३९/१/अ | ०.४२.९७ |
| ९१ | ३९/१/ब | |
| ९२ | ३९/२/अ | |
| ९३ | ३९/२/क | |
| ९४ | ३९/२/ब | |
| ९५ | ३९/३/अ | |
| ९६ | ३९/३/ब | |
| ९७ | ३९/४ | |
| ९८ | ४०/१/अ | ०.७३.७५ |
| ९९ | ४०/१/क | |
| १०० | ४०/१/ब | |
| १०१ | ४०/२/अ | |
| १०२ | ४०/३ | |
| १०३ | ४०/६ | |
| १०४ | ४०/७ | |
| १०५ | ४०/८ | |
| १०६ | ४०/९ | |
| १०७ | ४०/१० | |

पान ७ वर..



# श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालयातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

पनवेल : रामप्रहर वृत्त

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या द्रोणागिरी येथील श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासनातर्फे घेण्यात आलेल्या २०२५-२६च्या उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. हजारो विद्यार्थ्यांच्या स्पर्धेतून या विद्यालयातील पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांनी कठोर मेहनत, जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर शिष्यवृत्तीधारक लाभार्थी म्हणून आपले नाव यादीत नोंदवले आहे, जी संपूर्ण विद्यालयासाठी अत्यंत गौरवाची गोष्ट ठरली आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या परीक्षेत पाचवीमधून ओवी पाटील, अवनी म्हात्रे, गार्गी पाटील, रुही घरत, रुंजी कोंडिलकर, स्मित निनावे, पीयूशराज पासवान, गौरांगी घरत आणि कुमार रुद्राक्ष घरत या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती यादीत स्थान मिळवून यश संपादन केले. तसेच आठवीमधून विधी समीर म्हात्रे, दुर्वा निलेश ठाकूर आणि ओम अंकुश डोके हे विद्यार्थी यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाले आहेत. या पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना शासनातर्फे दरमहा शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.

या गौरव सोहळ्याप्रसंगी संस्थेचे सदस्य ॲड. राहुल घरत, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांच्यासह स्कूल कमिटीचे सर्व सदस्य आणि शिक्षकवृंद उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कायम तत्पर असणाऱ्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांच्या मार्गदर्शनाबद्दल विद्यार्थ्यांनी व पालकांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहेत.





































# शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना अभ्यास साहित्य

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

"उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षणाची भक्कम पायाभरणी... प्रत्येक विद्यार्थ्याच्या यशासाठी एक छोटासा प्रयत्न!" या भावनेतून पनवेल महानगरपालिका शाळा क्रमांक २, हुतात्मा हिरवे गुरुजी शाळा (दगडी शाळा) येथील इयत्ता चौथी व सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची पुस्तके, गाईड व प्रश्नसंचांचे वितरण भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल शहर सरचिटणीस अनिमेष ओझे यांच्या वतीने हा शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आला.



विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेची योग्य दिशा मिळावी, दर्जेदार अभ्यास साहित्य सहज उपलब्ध व्हावे आणि अधिकाधिक विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी व्हावेत या उद्देशाने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी उपयुक्त पुस्तके, मार्गदर्शक, प्रश्नसंच असे आवश्यक अभ्यास साहित्य भेट देण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महापौर नितीन पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, भाजप पनवेल शहराध्यक्ष तथा नगरसेवक सुमित झुंजारराव, नगरसेवक राजू सोनी, नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, पनवेल शहर सरचिटणीस अमित ओझे, रूपेश नागवेकर, भाजयुमो शहराध्यक्ष हिमेश बहिरा, प्रभागाध्यक्ष अनिमेष पटवर्धन, हर्षल बहाडकर, आशुतोष पाटील, आकाश गाडे यांच्यासह अनेक पदाधिकारी, शिक्षक, पालक उपस्थित होते.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शिक्षण हेच जीवनात यश मिळविण्याचे सर्वात प्रभावी साधन असल्याचे सांगितले. शिष्यवृत्ती परीक्षा विद्यार्थ्यांमधील गुणवत्ता, अभ्यासाची सवय आणि स्पर्धात्मक वृत्ती विकसित करणारी परीक्षा आहे. नियमित अभ्यास, वेळेचे योग्य नियोजन, सातत्यपूर्ण सराव आणि आत्मविश्वासाच्या बळावर प्रत्येक विद्यार्थी निश्चितच यश मिळवू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी जिद्द, मेहनत व चिकाटीने प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.



# नीट यूजी परीक्षेत पनवेलचा सानिध्य डोंगरे मुंबईत अव्वल

**पनवेल : वार्ताहर**

आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडच्या (एईएसएल) पनवेल शाखेतील विद्यार्थी सानिध्य डोंगरे याने नीट यूजी २०२६ परीक्षेत ७२० पैकी ७०० गुण मिळवत अखिल भारतीय क्रमवारीत (एआयआर) २८वा क्रमांक पटकावला असून मुंबई शहरात अव्वल स्थान मिळवले आहे.

एआयआरमध्ये २८वा क्रमांक मिळवणे हे माझ्यासाठी माझे एक स्वप्न पूर्ण झाल्यासारखे आहे. माझ्या पालकांनी माझ्यावर ठेवलेला विश्वास आणि आकाशमधील शिक्षकांनी दिलेले सातत्यपूर्ण मार्गदर्शन यामुळेच हे यश शक्य झाले आहे. नियमित सराव परीक्षा, कामगिरीचे विश्लेषण आणि शंका निरसन सत्रांमुळे माझा आत्मविश्वास अतिशय वाढला गेला. त्यापुढे एक यशस्वी डॉक्टर होण्यासाठी आणखी मेहनत घेण्याची प्रेरणा या यशातूनच मला मिळाली आहे, असे सानिध्य डोंगरे यांनी सांगितले.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिलानी मौजे दुंदराई ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**

**मौजे- दुंदराई, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| दुंदराई | धाऊ परशुराम म्हसकर<br>भाऊ परशुम म्हसकर<br>धनाजी परशुराम म्हसकर<br>विश्वास परशुराम म्हसकर | ३३ | ३ | ०-५९-३०<br>०-१०-००<br>एकूण ०-६९-३० | ४.८१ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणा-या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत ह्याची नोंद घ्यावी.

दिनांक : १७/०७/२०२६
पनवेल

**सही/-**
**ॲड. प्रधान मधूकर पाटील**
**१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स,**
**ता. पनवेल, जि. रायगड**
**मोबाईल. ९३२४३७५५०२**


# 'सीकेटी'त किशोरवयीन मुलींच्या सक्षमीकरणासाठी अभिनव उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



महाराष्ट्र शासन (महिला व बालविकास विभाग) आणि वायसा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता आठवी ते नववीच्या किशोरवयीन मुलींसाठी "ड्रीमकिट-मनाशी गट्टी, विचारांशी बट्टी" याअंतर्गत परिसंवादाचे आयोजन सीकेटी विद्यालयात करण्यात आले होते. यावेळी इयत्ता आठवी व नववीच्या सर्व विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

या उपक्रमासाठी संस्थेमार्फत प्रोग्राम ऑफिसर सागर वानखेडे, पुष्पा कडू, अलौकिका शिरोळे आणि श्रुती पालसकर (सामाजिक मानसशास्त्रज्ञ) यांनी विद्यार्थिनींना कार्यक्रमाचा हेतू समजावून सांगितला तसेच किशोरवयीन मुलींना नेमके काय करणे अपेक्षित आहे याबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी सर्व विद्यार्थिनींना "ड्रीमकिट-मनाशी गट्टी, विचारांशी बट्टी" पुस्तकाचे वाटपही करण्यात आले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वाती काळे, शिक्षिका शाल्वी ठाकूर यांनी कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. &<br>Name of Tender | **RFx No. :- 7000040774**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-26/2026-2027**<br>RFx e-tender for work of repairing of 22/33kV Current Transformer/ Potential Transformer at various Substations under EHV (O&M) Division Panvel.<br>**Tender amount Limited to Rs. 7,00,000/-,**<br>**EMD amount Rs. 7,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **17.07.2026, 18:00 Hrs. to 01.08.2026, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 01.08.2026 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **02.08.2026 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**E.H.V. (O&M) DN. PANVEL**


# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मोखाडा महाविद्यालयाच्या अंकाचे प्रकाशन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या वार्षिक अंकाचे प्रकाशन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १७) करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.एन. चांदोर, एस.ए. फुंदे, संपादक टी.एम. पराडके, सहसंपादक पी.टी. भोये, कार्यालय विभागप्रमुख आहेर उपस्थित होते.

वार्षिक अंकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ मिळते, असे प्रतिपादन यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले. विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या लेखन कौशल्याला प्रोत्साहन मिळावे आणि साहित्य, कला व संस्कृतीबद्दलची आवड वृद्धिंगत व्हावी, या उदात्त हेतूने दरवर्षी संस्कृती अंक प्रकाशित केला जातो.

अंकात विद्यार्थी व प्राध्यापकांनी विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पर्यावरणीय विषयांवर आपले विचार प्रभावीपणे मांडले आहेत. वर्षभरात झालेल्या विविध विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांची सविस्तर माहितीही अंकात देण्यात आली आहे.

# फुंडे विद्यालयात मोफत वह्या, गणवेश वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाळेत गुरुवारी (दि. १६) श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने इयत्ता ५वी ते १०वीच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप कार्यक्रम संपन्न झाला. विद्यालयाचे लेखनिक नवनीत ठाकूर यांच्या प्रयत्नातून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने सुमारे १५०० वह्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी चंद्रविलास घरत आणि सूरज ठाकूर यांच्या माध्यमातून ४५ गणवेश वाटपासाठी रक्कम ३२,२५० रु, श्रीकांत पाटील यांच्या माध्यमातून १५ गणवेश वाटपासाठी रक्कम १२,२५०, अमर पाटील यांच्या माध्यमातून १० गणवेश वाटपासाठी रक्कम ७७५० रुपये प्राप्त झाले. सर्व मान्यवरांच्या हस्ते मोफत वह्या आणि मोफत गणवेशाचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे चेअरमन कृष्णा कडू व माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष दीपक ठाकूर यांनी मनोगत व्यक्त केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस प्रोत्साहन आणि शिक्षणाला निश्चितच बळ मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे. दरम्यान, दातृत्व करणाऱ्या सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी चेअरमन कृष्णा कडू, यशवंत ठाकूर, दीपक ठाकूर, चंद्रविलास घरत, सूरज ठाकूर, परेश पाटील, प्राचार्य बी.बी. साळुंखे, उपमुख्याध्यापिका एस.डी. थोरात, पर्यवेक्षिका एस.एस. पाटील, वरिष्ठ लेखनिक नितीन ठाकूर, नवनीत ठाकूर तसेच ज्युनिअर कॉलेज प्राध्यापक, माध्यमिक सेवकवृंद, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख एच.एन. पाटील यांनी केले.



पान ५ वरुन

| अ. क्र. | सर्व्हे नं. | संपादनाचे क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|
| १०८ | ४७/१ | ०.५२.०६ |
| १०९ | ४७/२ | |
| ११० | ४७/३ | |
| १११ | ४७/४ | |
| ११२ | ४७/५ | |
| ११३ | ४७/६ | |
| ११४ | ४७/७ | |
| ११५ | ४८/१ | ०.१७.२८ |
| ११६ | ४८/२ | |
| ११७ | ४८/३ | |
| ११८ | ४८/४ | |
| ११९ | ४८/५ | |
| १२० | ४८/६ | |
| १२१ | ४८/७ | |
| १२२ | ४८/८ | |
| १२३ | ४८/१० | |
| १२४ | ४८/१२ | |
| १२५ | ४८/१३ | |
| १२६ | ४८/१४ | |
| १२७ | ४९/१ | ०.०८.८२ |
| १२८ | ४९/२ | |

| अ. क्र. | सर्व्हे नं. | संपादनाचे क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|
| १२९ | ४९/३ | |
| १३० | ४९/४ | |
| १३१ | ५०/१ | ०.५८.८१ |
| १३२ | ५०/२ | |
| १३३ | ५०/३ | |
| १३४ | ५०/४ | |
| १३५ | ५०/५ | |
| १३६ | ५०/६ | |
| १३७ | ५०/७ | |
| १३८ | ५०/८ | |
| १३९ | ५०/९/अ | |
| १४० | ५०/९/ब | |
| १४१ | ५०/१० | |
| १४२ | ५०/११ | |
| १४३ | ५०/१२ | |
| १४४ | ५०/१३ | |
| १४५ | ५०/१४ | |
| **एकूण** | | **५.८४.४०** |

### अनुसूची-दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव** प्रजिमा १११ ते भालीवाडी सायडोंगर१ उदंचन जलविदयुत प्रकल्प प्रस्तावित पोहोच रस्त्याचे बांधकाम तयार करणेसाठी.

**प्रकल्पकार्याचे वर्णन** मौजे भालिवडी, पोटल, आंबोट, सायडोंगर व पाली तर्फे कोतल खलाटी, ता. कर्जत जि. रायगड येथील जमिनीचे पोहोच रस्त्याचे बांधकाम करणे.

**समाजाला मिळणारे लाभ** कर्जत तालुक्यातील मौजे साई डोंगर येथे टोरेंट पॉवर मार्फत ३००० मेगावॉट चा उदंचन जल विद्युत प्रकल्प विकसित करण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे वीज भार व्यवस्थापन आणि शिखर मागणी पूर्ण करण्यासाठी साठवण क्षमता उपलब्ध करून महाराष्ट्र राज्यातील अक्षय ऊर्जेचा वाढता वाटा समर्थित होणार आहे. हा पूर्णतः हरित उर्जा प्रकल्प (Green Energy Project) आहे. सदर प्रकल्प दुर्गम भागात असल्याने प्रकल्पासाठी लागणारे बांधकाम साहित्य, इलेक्ट्रो-मेकॅनिकल पार्टस-टर्बाइन, जनरेटर इत्यादींची वाहतुक करणे या प्रस्तावित रस्त्यामुळे शक्य होणार आहे. प्रस्तावित रस्त्याच्या ५.९११ कि.मी. लांबी ही प्रजिमा म्हणून दर्जान्नत करण्यात आलेली असून जलविद्युत प्रकल्पाशी तालुक्याला जोडणे सोईस्कर आहे. तसेच कर्जत तालुका हा पर्यटन तालुका म्हणून उदयोन्मुख होत आहे. सदर रस्त्यामुळे निसर्ग सौंदर्य, ऐतिहासिक वारसा, साहसी उपक्रम, सांस्कृतिक व धार्मिक ठिकाणे, आरोग्य पर्यटन यासाठी भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी सुरक्षित, सोयीस्कर आणि जलद प्रवास शक्य होऊन स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

### अनुसूची-तीन

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :-** निरंक

### अनुसूची-चार

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :-** **महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग एक-कोकण विभागीय पुरवणी क्रमांक एसआयए-२०२६/प्र.क्र.३/कार्या-१, दि. २ जुलै २०२६ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम १० क खालील उक्त प्रकल्पाला उक्त अधिनियमाच्या प्रकरण-दोन आणि प्रकरण-तीन च्या तरतूदी लागू करण्यापासून लोकहितास्तव सूट देण्यात आली आहे.**

### अनुसूची-पाच

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील :-** निरंक

सदर अधिसुचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याने कायद्याच्या कलम ११ चे उप-कलम (१) खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), रायगड अलिबाग यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

**टिप** - उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी भूसंपादन रायगड अलिबाग यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

अलिबाग,
दिनांक ९ जुलै २०२६.


**सही/-**
**श्रीकांत गायकवाड,**
उपजिल्हाधिकारी भूसंपादन,
रायगड अलिबाग

क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/६९/९२७/२०२६


सामाजिक
बांधिलकी,
पत्रकारितेतील
मूल्य जपत
प्रगती करणारे
वृत्तपत्र..
दैनिक
राम प्रहर
१८व्या
वर्धापन
दिनाच्या हार्दिक
शुभेच्छा!
शुभेच्छुक
नितीन जयराम पाटील
महापौर-पनवेल महानगरपालिका
जिल्हा सरचिटणीस : भाजपा उत्तर रायगड
पनवेल विधानसभा प्रमुख भाजपा
संस्थापक-अध्यक्षः जाणीव एक सामाजिक संस्था


सामाजिक उत्तरदायित्व, निर्भीड पत्रकारिता
आणि विश्वासाची अखंड परंपरा...
दैनिक
राम प्रहर
१८व्या
वर्धापन
दिनाच्या
हार्दिक
शुभेच्छा!
18 जुलै
शुभेच्छुक
अनिल भगत
मा. नगरसेवक,
पनवेल महानगरपालिका


18 जुलै
वाचकांचा
विश्वास जपत
सत्यासाठी
सदैव कटिबद्ध
असणारे
वृत्तपत्र...
दैनिक
राम प्रहर
१८व्या
वर्धापन
दिनाच्या हार्दिक
शुभेच्छा!
शुभेच्छुक
ॲड.प्रकाश बिनेदार
सभागृह नेता
पनवेल महानगरपालिका


सामाजिक उत्तरदायित्व, निर्भीड पत्रकारिता
आणि विश्वासाची अखंड परंपरा...
दैनिक
राम प्रहर
१८व्या
वर्धापन
दिनाच्या
हार्दिक
शुभेच्छा!
शुभेच्छुक
महेंद्र घरत
आंतरराष्ट्रीय
कामगार नेते


भाजपा
18 जुलै
स्थानिक,
प्रकल्पग्रस्त आणि
भूमिपुत्रांच्या
लढ्याचा बुलंद
आवाज म्हणून
नावारूपास
आलेले अग्रणी
वृत्तपत्र...
दैनिक
राम प्रहर
वर्धापन
दिनाच्या हार्दिक
शुभेच्छा!
शुभेच्छुक
सुधीर घरत
कामगार नेते,
राष्ट्रीय कोषाध्यक्ष, भारतीय पोर्ट अँड
डॉक मजदूर महासंघ - (बी.एम.एस.)


जनतेच्या
विश्वासाची
परंपरा जपत
यशस्वी
वाटचाल
करणारे
वृत्तपत्र...
18 जुलै
दैनिक
राम प्रहर
१८व्या
वर्धापन
दिनाच्या हार्दिक
शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री. सुरेश पाटील
राष्ट्रीय महामंत्री : भारतीय मजदूर संघ
(पोर्ट अँड डॉक महासंघ)
सदस्य : वेतन करार समिती
(बीडब्ल्यूएनसी), आयपीए दिल्ली
जिल्हाध्यक्ष : भारतीय मजदूर
संघ, रायगड
अध्यक्ष : जेएनपीए
जनरल कामगार संघटना


दैनिक
राम प्रहर
१८व्या
वर्धापन
दिनाच्या हार्दिक
शुभेच्छा!
शुभेच्छुक
मेसर्स बी. आर. ठाकूर गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर
प्रोप्रायटर : श्री. भार्गव रामदास ठाकूर
कोपर – गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड. ऑफीस दूरध्वनी क्र.९९३०४०७७४६


सत्य, विश्वास आणि
निष्पक्ष पत्रकारितेचा अखंड प्रवास...
दैनिक
राम प्रहर
वर्धापन
दिनाच्या हार्दिक
शुभेच्छा!
कुणाल कृष्णा पाटील
(युवा नेते)
सौ. कुंदा कृष्णा पाटील
मा. पंचायत समिती सदस्या
कृष्णा पाटील
मा. सरपंच
अध्यक्ष, प्रभाग क्र. २
पनवेल महानगरपालिका
शुभेच्छुक
श्री. कृष्णाशेठ पाटील सामजिक विकास मंडळ, पडघे
(मु. पो. पडघे, ता. पनवेल, जि. रायगड)


18 जुलै
निष्पक्ष,
निर्भीड आणि
विश्वासार्ह
पत्रकारितेचा
मापदंड...
दैनिक
राम प्रहर
१८व्या
वर्धापन
दिनाच्या हार्दिक
शुभेच्छा!
शुभेच्छुक
Raman N. Bohara
Balaji Stone Crushing Plant
Site : At. Bombavi Pada, Post Owle, JNPT, Ex. Highway,
Near Gavhan Phata, Tal. Panvel, Navi Mumbai-410206.
Off. : 170, M. G. Rd., Mahavir Chowk, Behind Amantran Hotel,
Panvel, Navi Mumbai. Tel. 022-27451406. Telefax : 022-27461800.